अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. २५ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २९६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

आईचा खून करून पुरावा नष्ट करणाऱ्या मुलास जन्मठेपेची शिक्षा

बार्शी : आईचा खून करून पुरावा नष्ट करणाऱ्या मुलास येथील सत्र न्यायालयाने जन्मठेप व ७ हजार रूपये दंडाची शिक्षा ठोठावली. श्रीराम नागनाथ फावडे (वय २३ रा. वाणी प्लॉट, बार्शी) असे दोषारोपसिध्द आरोपीचे नांव आहे. सत्र न्यायाधीश एल एस चव्हाण यांनी हा निकाल दिला. रूक्मीणी नागनाथ फावडे यांचा १२ ऑक्टोबर २०२१ रोजी खून झाला होता.

बार्शी शहरातील वाणी प्लॉट येथील रूक्मीणी यांचा मृत्यू हा डोक्यातील जखमा झाल्याने अतिरक्तस्त्रावाने झाल्याचे प्राथमिक शवविच्छेदन अहवालातून स्पष्ट झाले. पोलीसांनी अधिक चौकशी केली असता, मयत महिला रूक्मीणी व तिचा मोठा मुलगा श्रीराम हे दोघे सदर ठिकाणी राहत होते. मोठा मुलगा श्रीराम व मयत रूक्मीणी यांच्यात पैशावरून नेहमी वाद होत होते. त्याबाबत पोलीस स्टेशनला तक्रारीही दाखल आहेत. पोलीसांनी श्रीराम विरूध्द खुनाचा गुन्हा दाखल केला होता. पो.कॉ अरूण माळी यांनी फिर्याद दिली होती.

तत्कालीन पोलीस निरीक्षक रामदास शेळके यांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. न्या.चव्हाण यांच्यासमोर या खटल्याची सुनावणी झाली. यात पोलीस निरीक्षक, वैदयकीय अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यात आली. सरकारी वकील राजश्री कदम यांनी परिस्थितीजन्य पुरावे निदर्शनास आणून देत उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर केले. सरकारपक्षाचा युक्तीवाद तसेच सादर केलेले पुरावे विचारात घेवून गुन्हा शाबीत झाल्याने न्यायालयाने आरोपी श्रीराम फावडे यास जन्मठेपेची शिक्षा व सात हजार रूपये दंड ठोठावला. सरकारपक्षातर्फे ॲड राजश्री कदम यांनी काम पाहिले.

भल्या पहाटे पोलीस अधिकाऱ्याचा प्रताप...

पिस्तुलातून अगोदर पत्नी-पुतण्याची हत्या नंतर स्वत:वर गोळी झाडून केली आत्महत्या

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

सोमवारी भल्या पहाटे पुणे हादरले. मूळ पुण्यातील रहिवासी असलेले आणि अमरावती पोलीस दलात सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत असलेले भरत गायकवाड हे सुटीसाठी आपल्या घरी आले होते.पहाटे पहाटे त्यांचा राग अनावर झाला आणि खाजगी पिस्तूल बाहेर काढत पहिल्यांदा झोपेत असलेल्या पत्नी व पुतण्यावर गोळ्या झाडून त्यांना ठार केले. त्यानंतर त्याच पिस्तुलातून स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना भल्या पहाटे साडेचार वाजताच्या सुमारास घडली.ही वार्ता वाऱ्यासारखी पसरताच संपूर्ण राज्यातील पोलीस दलात एकच खळबळ उडाली. गायकवाड यांनी स्वत:चे जीवन संपवल्यामुळे या हत्याकांडाचा तपास कसा होणार? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. कौटुंबिक वादातून हा प्रकार घडल्याचा चतु:शृंगी पोलीस ठाण्याचा अंदाज आहे.

पुणे शहरातील चतुश्रृंगी परिसरातील रहिवासी असलेले गायकवाड हे अमरावती पोलीस दलात सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत होते. ते काही दिवसांपासून पुण्यात सुटीवर आले होते. सोमवारी पहाटे त्यांनी स्वत:कडे असलेल्या पिस्तुलातून पत्नी मोनी आणि पुतण्या दीपक याच्यावर गोळीबार करून त्यांची हत्या केली आणि त्याच पिस्तुलातून स्वत:वर देखील गोळी झाडून घेतली.

खासगी पिस्तुलाचा वापर : पोलिसांनी गायकवाड यांच्याकडे असलेले पिस्तूल जप्त केले आहे. गायकवाड यांनी खासगी वापरासाठी पिस्तूल घेतले होते. त्यांच्याकडे शस्त्र परवाना असल्याची माहिती पोलिसांनी दिली. गायकवाड यांनी पत्नी आणि पुतण्याचा खून का केला? याबाबतची माहिती मिळू शकली नाही. चतु:शृंगी पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास सुरू आहे.

तोपर्यंत सारे संपले... : पुण्यातील बाणेर, बालेवाडी भागात गायकवाड कुटुंब वास्तव्यास होते. पोलीस दलात वरिष्ठ पदावर काम करत असलेले आणि सध्या सुट्टीवर असलेले भरत गायकवाड हे शनिवारीच पुण्यातील घरी आले होते. मात्र आज पहाटे त्यांनी आधी पत्नी मोनी गायकवाड आणि नंतर पुतण्या दीपक गायकवाड यांची गोळी झाडून हत्या केली. ही घटना घडली तेव्हा गायकवाड यांची आई आणि दोन मुलेही घरात होती. पहाटे गोळी झाडण्याचा आवाज ऐकताच त्यांनी खोलीकडे धाव घेतली. मात्र तोपर्यंत सगळे संपले होते. हत्याकांडानंतर गायकवाड यांच्या घाबरलेल्या मुलांनी या घटनेबाबतची माहिती फोनद्वारे पोलिसांना दिली. त्यानंतर पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता घरात सुसाईड नोट आढळून आलेली नाही. त्यामुळे या घटनेमागील कारणांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास करण्यात येत आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांच्याकडून देण्यात आली आहे.

असा घडला थरार...

गायकवाड जेव्हा सुट्टी घेऊन पुण्यात यायचे, तेव्हा त्यांचा पुतण्या दीपक (वय ३४,रा.धायरी पुणे) हा त्यांच्यासाठी मटण घेऊन बाणेर येथे जात असे. यावेळी पुतण्याला थोडी देखील कल्पना नव्हती की, त्याच्या सोबत काय होणार आहे.रविवारी रात्री घरातील सर्वांचे जेवण झाल्यानंतर दीपक हा पाऊस सुरू असल्याने धायरी येथील आपल्या घरी जाऊ शकला नाही. तो काका गायकवाड यांच्या बाणेर येथील घरी थांबला. बाणेर येथील घरात काका भरत यांच्यासह त्यांची आई, पत्नी मोनी गायकवाड लहान मुलगा आणि पुतण्या असे ५ जण होते. जेवण केल्यानंतर भारत आणि त्याच्या पत्नी मोनी गायकवाड हे त्यांच्या खोलीत गेले. खोलीत गेल्यानंतर भारत गायकवाड हे मद्य पित होते. पहाटे ३ वाजता अचानक वाद झाल्याचा आवाज आला, भारत गायकवाड यांनी पहिल्यांदा स्वत:च्या छतावर गोळी झडली. गोळीच्या आवाजाने कुटुंबातले सगळे लोक खडबडून जागे झाले. त्यानंतर मुलगा आणि पुतण्या याने दरवाजा वाजला, मात्र आतून वाद वाढल्याचा आवाज येत होता. त्यानंतर मुलाने रुमची दुसरी किल्ली आणली. दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला, तेव्हा रुममधून पुन्हा गोळी झाडण्याचा आवाज आला. मुलाने रुमचा दरवाजा उघडला आणि पुतण्या दीपकने आधी खोलीत गेला. तेव्हा गायकवाड यांनी त्याला गोळी मारली. मुलाने रुममध्ये पाहिले असता त्याची आई मोनी गायकवाड गोळी लागून खाली पडली होती. त्यानंतर आई आणि मुलाने भरत यांना अडवण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी सर्वांना बाहेर ढकलून दिले आणि स्वत:ला गोळी मारून आत्महत्या केली. या घटनेत पहिली गोळी गायकवाड यांनी छतावर झाडली. दुसरी गोळी पत्नी मोनीवर झाडली ज्यात त्यांचा मृत्यू झाला. तिसरी गोळी पुतण्या दीपक याच्यावर झाडली. चौथी गोळी कुटुंबियांना घाबरवण्यासाठी तर पाचवी गोळी स्वत:वर झाडून घेतली.

समान नागरी कायदा २०२४ पर्यंत होणे अशक्य : डॉ.भागवत

सुराज्य/सोलापूर

देशात सध्या समान नागरी कायद्यावर चांगलेच मंथन सुरू आहे. त्यातच, २०२४ च्या निवडणुकांपूर्वी केंद्र सरकार समान नागरी कायदा करेल, अशी चर्चाही होत आहे. सरकारनेही हालचालीही सुरू केल्या आहेत. मात्र, भाजप सरकारचे राज्यसभेत बहुमत नाही. त्यामुळे २०२४ पर्यंत देशात समान नागरी कायदा लागू करणे शक्य नाही, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी सोमवारी सोलापुरात बोलताना सांगितले.

येथील हिराचंद नेमचंद सभागृहात सकाळी भागवत यांनी संघ स्वयंसेवकांशी संवाद साधला.त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, देशात लोकसंख्या नियंत्रण कायदा लागू होणे आवश्यक आहे. एखाद्या समाजाची लोकसंख्या वाढली की, देशाच्या विभागणीचा उठाव होतो. आपला देश पूर्वी एकसंघ होता. धर्माच्या आधारावर देशाची फाळणी झाली. लोकसंख्या नियंत्रणासाठी समान नागरी कायदा आवश्यक आहे. समान नागरी कायद्यासाठी राज्यसभेत सरकारचे बहुमत नाही. त्यामुळे २०२४ पर्यंत हा कायदा लागू होणे शक्य नाही. भागवत यांचे रविवारी रात्री उशिरा सोलापुरात आगमन झाले. चौपाड येथील संघ कार्यकर्त्यांच्या घरी ते मुक्कामी राहिले. सोमवारी सकाळी दहाच्या सुमारास ते विजयपूरकडे रवाना झाले. भागवत हे दरवर्षी गुरुदेव रानडे यांच्या निंबाळ येथील आश्रमात काही वेळ व्यतीत करण्यासाठी येतात. या कार्यक्रमानुसार ते रविवारी रात्री सोलापुरात पावणे अकराच्या सुमारास वंदे भारत एक्सप्रेसने दाखल झाले. त्यांच्या दौऱ्यामुळे सोलापुरात ठीक ठिकाणी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तयार करण्यात आला होता.



भागवत हे दरवर्षीप्रमाणे निंबाळ येथील गुरुदेव रानडे आश्रमात जाण्याकरिता सोलापुरात सोमवारी रात्री आले.दरवर्षीप्रमाणे तीन दिवस ते या आश्रमात ध्यानासाठी जाणार होते. परंतु रा. स्व. संघाचे माजी सहसरकार्यवाह मदनदासजी देवी यांचे सोमवारी निधन झाल्यामुळे त्यांचा पुढील दौरा रद्द करण्यात आला. सोमवारी दिवसभर ते निंबाळला थांबले. देवी यांच्यावर मंगळवारी सकाळी पुण्यामध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. भागवत हे अत्यसंस्काराला उपस्थित राहणार आहेत. त्याकरिता ते सोमवारी रात्री पुण्याकडे रवाना झाले. गुरुवार २७ जुलै रोजी ते पुन्हा सोलापुरात येत असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात आज सुप्रीम कोर्टात सुनावणी

नवी दिल्ली : गेल्या एक वर्षापासून ओबीसी आरक्षणाच्या मुद्यांवरून राज्यातील १५ महानगरपालिका, ९२ नगरपालिकांच्या निवडणुका होऊ शकलेल्या नाहीत. या प्रकरणाच्या सुनावणीला अनेकदा तारीख पे तारीख मिळत असल्याने आता मंगळवारी २५ जुलैला होणाऱ्या सुनावणीकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

राज्यातील ९२ नगरपालिका आणि जवळपास १५ महानगरपालिकांच्या निवडणुका या ओबीसी आरक्षण व बदललेल्या प्रभाग रचनेमुळे कोर्टाच्या कचाट्यात अडकल्या असून या निवडणुकांचा मुद्दा सुप्रीम कोर्टात गेला आहे. अनेक दिवसांपासून ही सुनावणी प्रलंबित आहे. या प्रकरणात अनेकदा सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. तर अनेकदा कोर्टात युक्तिवाद होऊ शकला नाही. त्यामुळे आता उद्या होणाऱ्या सुनावणीत तरी हा मुद्दा मार्गी लागणार की, पुन्हा यावरील सुनावणी पुढे ढकलणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. नगरपालिकांसाठी ओबीसी आरक्षण लागू होणार की नाही याचा फैसला सुनावणीनंतरच समोर येणार आहे.

दौंडमधून उजनी धरणात फ्लो पुन्हा वाढणार

सुराज्य/सोलापूर

गेल्या दोन दिवसांपासून उजनी धरणात दौंड येथून येणारा पाण्याचा विसर्ग कमी-जास्त होतो आहे.सोमवारी सकाळी २३ हजार ८७० इतका होता. सायंकाळी तो कमी झाला आणि १७ क्युसेक इतका झाला.

पुणे जिल्ह्यात पावसाला सुरूवात झाली असून भीमाशंकराच्या डोंगरात संततधार सुरू आहे तसेच कळमोडी धरणातून पाणी सोडण्यात आले आहे.त्यामुळे मंगळवारी दौंड येथून पाण्याचा विसर्ग वाढेल,असे उजनी धरण व्यवस्थापनाच्या सूत्राने सांगितले.उजनीच्या वर असलेली धरणे ५० टक्क्यांपेक्षा अधिक भरलेली आहेत.पाऊस असाच लागून राहिला तर तेथूनही पाणी सोडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

कर्नाटकातील तरुणीवर बलात्कार; सोलापुरातील आरोपीला ३ दिवसांची कोठडी

सुराज्य/सोलापूर

जुना पुणे नाका येथील रुग्णालयात नातेवाईका सोबत आलेल्या एका कर्नाटकातील तरुणीला रिक्षातून नेऊन तिच्यावर बलात्कार केल्याप्रकरणी मन्यम व्यंकटय्या रामगल (वय ५२ रा.मड्डी वस्ती,भवानी पेठ सोलापूर) याला फौजदार चावडीच्या पोलिसांनी अटक केली. त्याला ३ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याच्या आदेश न्यायालयाने सोमवारी दिला.

> ती तरुणी पुणे नाका येथील रुग्णालयातून गायब झाल्यानंतर तिच्या भावाने पोलिसात हरवल्याची तक्रार दाखल केली होती. पोलिसांच्या तपासात ती विजापूर रोडवरील एका हॉटेलात २२ जुलै रोजी आढळून आली. त्यावेळी हा प्रकार उघडकीस आला.आणि पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्नाटकात राहणारी ती तरुणी सोलापुरात नातेवाईकाकडे आली होती. १७ जुलै रोजी ती तिच्या वहिनी सोबत पुणे नाका येथील एका हॉस्पिटलमध्ये गेली होती.त्यावेळी तिच्या परिचयातील मन्यम रामगल हा येथे आला. आणि तिला रिक्षातून घरी सोडतो असे म्हणत बळजबरीने एका मंदिरात येऊन आपण दोघे लग्न करू असे म्हणत तिच्या गळ्यात दोरा बांधला.आणि तिला एका हॉटेलमध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केला.अशा आशयाची फिर्याद पिडीत तरुणीने फौजदार चावडी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी मन्यम रामगल या आरोपीला अटक करून गुन्हा दाखल केला. त्याला २७ जुलै पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने आज दिला.पुढील तपास सहाय्यक निरीक्षक माने करीत आहेत.

सेवानिवृत्त सैनिकाची तीन लाख रक्कमेची पिशवी चोरट्यांनी पळवली

मोहोळ : लघुशंकेसाठी थांबलेल्या सेवानिवृत्त सैनिकाच्या मोटरसायकलची तीन लाख रक्कम असलेली पैशाची पिशवी येऊन मोटरसायकल वरील दोन चोरट्यांनी पोबारा केला. ही घटना मोहोळ शहरापासून काही अंतरावर घडली.

वाफळे गावातीलगोपीनाथ भानुदास दाडे हे सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास मोहोळ येथील कुरुल रोडवर असलेल्या स्टेट बँकेच्या खात्यातून घर बांधण्याच्या कामासाठी पैसे काढण्यासाठी त्यांच्या एमएच १३ ए.वाय.६६९७ या क्रमांकाच्या मोटरसायकल वरून वाफळे येथून मोहोळ येथे आले होते. स्टेट बँकेच्या खात्यातून पैसे काढून ते आपल्या वाफळे गावाकडे जाण्यासाठी निघाले होते. बँकेतून काढलेली तीन लाख रुपयांची रक्कम त्यांनी आपल्या पिशवी मध्ये ठेवून पिशवी मोटरसायकलच्या हँडलला अडकवली होती.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

आप्ले चांगले दिस येणार, निधी मिळाला !!!

कल्याण
600-63-779

मेन बाजार
247-30-677

हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकासाचा १७३ कोटींचा आराखडा

- जल पर्यटन, लाईट अँड साऊंड शो, उद्यान, वृक्ष लागवड, चिल्ड्रन पार्क होणार
- आराखडा शासनाला तात्काळ सादर करा : पालकमंत्री विखे-पाटील

सुराज्य/सोलापूर

जिल्हा प्रशासनाने श्री क्षेत्र हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकासासाठी केलेला १७३ कोटी २६ लाख ६७ हजार ५२६ रुपयांचा आराखडा तयार केला आहे. जल पर्यटन, लाईट अँड साऊंड शो, उद्यान विकास, वृक्ष लागवड, चिल्ड्रन पार्क केले जाणार आहे. या आराखडा तात्काळ शासनास सादर करा असे सूचना राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. श्री क्षेत्र हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा आढावा पालकमंत्री विखे पाटील यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे, नगर रचना सहायक कल्याण जाधव, भूसंपादन अधिकारी अभिजीत पाटील, मंद्रूप तहसीलदार राजशेखर लिंबारे आदी अधिकारी उपस्थित होते. श्री क्षेत्र हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी आवश्यक असलेली जमीन भूसंपादित करण्यासाठी कार्यवाही करावी.



या विकास आराखड्यात किती जमीन आवश्यक आहे. तसेच त्यासाठी किती शेतकऱ्यांची जमीन भूसंपादित करावी लागेल व त्यासाठी द्यावा लागणारा मोबदला याबाबतचाही निधी आराखड्यात प्रस्तावित करण्याच्या सूचना विखे पाटील यांनी यावेळी केल्या. या विकास काममुळे या भागात किती रोजगार निर्मिती होईल त्याचेही सर्वेक्षण करा. स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होण्यासाठी प्रयत्न करा. शासनाला आराखडा सादर करत असताना प्रत्येक विभागाला किती निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे त्याचाही स्वतंत्रपणे उल्लेख करण्याच्या सूचना केल्या.

जिल्हाधिकाऱ्यांनी केले आराखड्याचे सादरीकरण

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी श्री क्षेत्र हत्तरसंग कुडल विकास आराखड्याची माहिती दिली. कुडल संगम हे सोलापूर शहरा जवळील प्रमुख ऐतिहासिक महत्त्व असलेले एक अतिशय लोकप्रिय तीर्थक्षेत्र आहे. या ठिकाणी भीमा आणि सीना या दोन नद्यांचे संगम होतो. जिल्ह्यातील अनेक सुंदर प्राचीन मंदिरापैकी कूडल येथील श्री संगमेश्वर आणि श्री हरीहरेश्वर मंदिर पाहण्याजोगे असून हे ठिकाण राज्यातील सर्वोत्तम पर्यटन स्थळांपैकी एक असल्याचे सादरीकरण जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

असा आहे आराखडा

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी पूर्वीची ६ एकर जमीन आहे. ७.१४ एकर जमीन भूसंपादित करावी लागणार आहे. शेजारील आठ शेतकऱ्यांची ही जमीन आहे. ५ कोटी रुपयांचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना द्यावा लागणार आहे. जल पर्यटन, लाईट अँड साऊंड शो, उद्यान विकास, वृक्ष लागवड, चिल्ड्रन पार्क केले जाणार आहे. या सर्व कामासाठी १७३ कोटी २२ लाख ६७ हजार ५२६ रुपये इतक्या निधीची गरज आहे.